जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2025

तरुण भारत

# डॉ. बापूजी साळुंखे यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी करण्यात आली. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या इमारतीसमोरील डॉ. बापूजी साळुंखे पूर्णाकृती पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. तानाजी चौगुले, संशोधक विद्यार्थी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2025
सकाळ

# विज्ञान-तंत्रज्ञान शाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. ज्योती जाधव



ज्योती जाधव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठातापदी प्रा. डॉ. ज्योती जाधव यांची आज विद्यापीठ प्रशासनाने नियुक्ती केली. विद्यमान अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार यांच्या सेवानिवृत्तीमुळे हे पद रिक्त झाले होते. सध्या प्रा. जाधव या विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रमुखपदी कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वी विद्या परिषद अधिकार मंडळाच्या सदस्यपदाची जबाबदारी सांभाळली आहे. जैवतंत्रज्ञान अधिविभागातील जागतिक आघाडीच्या दोन टक्के शास्त्रज्ञांमध्ये त्यांचा समावेश आहे. त्यांनी जागतिक अॅडसॉर्पशन विज्ञानाच्या क्षेत्राला 'थिअरी ऑफ पोअर कॉम्प्लेशन' या नव्या सिद्धांताची तसेच 'शुभज्योत इक्वेशन' या नव्या समीकरणाची देणगी दिली आहे.

11 JUN 2025 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भौतिकशास्त्रच्या विद्यार्थ्याचे स्पर्धा परीक्षेत यश

- अजिंक्य शिंदे पोलीस उपनिरीक्षक परीक्षा उत्तीर्ण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागासाठी एक अभिमानाचा क्षण ठरला आहे. अधिविभागाचा माजी विद्यार्थी (बॅच २०२१-२२) अजिंक्य कदम यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत यश संपादन केले आहे. त्याच्या या यशाबद्दल भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर : अजिंक्य शिंदे यांचा सत्कार करताना डॉ. आर. जी. सोनकवडे. सोबत डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एम. व्ही. टाकळे.**

डॉ. सोनकवडे म्हणाले, अजिंक्य कदम सांगोला तालुक्यातील दहिवडी गावाचे रहिवासी आहेत. त्यांनी सेल्फ स्टडीतून पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत तिसऱ्या प्रयत्नात यश संपादन केले आहे.

यावेळी डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. एच. एम. यादव, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUN 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागाचे माजी विद्यार्थी अजिंक्य कदम यांनी एमपीएससीने घेतलेल्या परीक्षेत यश मिळविल्याबद्दल त्यांचा सत्कार अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र सोनकवडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी केशव राजपुरे, नीलेश तरवाळ, हेमराज यादव आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात अजिंक्य कदम यांचा सत्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागाचे माजी विद्यार्थी अजिंक्य नामदेव कदम यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षक परीक्षेत यश मिळविले. त्याबद्दल अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र सोनकवडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. अजिंक्य यांचे हे यश त्यांच्या कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात वक्तशीरपणा, शिस्त आणि नैतिक मूल्यांचा आदर केला पाहिजे. हे गुणच त्यांना यशाच्या शिखरावर घेऊन जातात, असे प्रा. सोनकवडे यांनी सांगितले. प्रा. डॉ. केशव राजपुरे, नीलेश तरवाळ, मानसिंग टाकळे, हेमराज यादव, ए. आर. पाटील, एस. एस. पाटील उपस्थित होते. दरम्यान, सांगोला तालुक्यातील दहिवडी गावाचा रहिवासी असलेल्या अजिंक्य यांनी कोणत्याही प्रकारच्या शिकवणीशिवाय, केवळ स्वतःच्या मेहनतीने आणि तिसऱ्या प्रयत्नात हे यश मिळविले आहे.